
ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

Volume : I Special Issue April - 2017



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
Sarkate Sadashiv Haribhau
Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | काया मातीत मातीत मधील कवितांचे स्वरूप | प्रा. डॉ. रविकांत शिंदे | ९८ |
| २७ | भारतीय समाज आणि स्त्री प्रश्न | प्रा. डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे | १०२ |
| २८ | सदानंद देशमुख यांच्या कांदबरीतील पुरुषांचे चित्रण | प्रा. डॉ. गायकवाड बबन | १०७ |
| २९ | मराठी कवितेतील जागतिकीकरण | प्रा. डॉ. शंकर वाघमारे | ११० |
| ३० | खेळाचे मानसशास्त्र | प्राचार्य डॉ. विश्वास कदम | ११४ |
| ३१ | मौद्रिक धोरण आणि भाववाढ नियंत्रण | डॉ. ढास डी.के. | ११७ |
| ३२ | सेवाकर ते जीएसटी कररचनेतील बदलाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | प्रा. डॉ. प्रशांत एन. देशमुख | १२१ |
| ३३ | वस्तु व सेवा कर आढावा | प्रा. डॉ. भगवान सांगळे | १२७ |
| ३४ | प्रा.मे.पुं.रेगे यांचे तात्विक चिंतन | डॉ. संजय ह. पाटील | १३१ |
| ३५ | राजर्षी शाहू महाराजांचे प्रशासन | डॉ. सटाले सिध्देश्वर नामदेव | १३८ |
| ३६ | महात्मा गांधी यांचे अहिंसासंबंधी विचार | श्री. समाधान विठ्ठल लोंढे | १४१ |
| ३७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास | श्री. बिरंगळ भरत गोरखनाथ | १४४ |
| ३८ | स्वतंत्र विदर्भाबाबत राजकीय पक्षांच्या भूमिका | माधव चोले | १४८ |
| ३९ | माडीया गोंड आदिवासींचे लोक-नृत्यगीत आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोन | प्रा. डॉ. सुरेश वि. धनवडे | १५१ |
| ४० | महाराष्ट्रातील विज निर्मितीचे स्रोत, प्रगती, वापर, समस्येचे आर्थिक अध्ययन : २००७-०८ ते २०१२-१३ | DR. S. G. Vaidya | १५६ |
| ४१ | The Study of Institutional Finance in Maharashtra | Prof. V.S. Kshirsagar | १६२ |
| ४२ | Water Quality Assessment for Physico-Chemical Analysis in Ahmednagar City | Dr. Mrs. S. R. Deshmukh | १६५ |
| ४३ | महाराष्ट्रातील आदिवासी लोककला | प्रा. डॉ. एम. बी. धोंडगे | १६८ |
| ४४ | डाळींब बागेचे व्यवस्थापन | प्रा. श्रीमती टेकाडे मंगल शांतीनाथ, कॅप्टन डॉ एम.जी.राजपंग | १७० |
| ४५ | राजज्ञा का पालन करने के लिए समर्पित शरीर गांधारी | डॉ. पुष्पा गोविंदराव गायकवाड, | १७६ |
| ४६ | मराठी भाषा अभ्यासातून मिळणाऱ्या नव्या संधी | डॉ. जयदेवी पवार | १८० |
| ४७ | बीड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे समाजशास्त्रीय अध्ययन - विशेष संदर्भाने गेवराई तालुका | प्रा. डॉ. तंगलवाड दत्ता माधवराव | १८३ |
| ४८ | मराठी साहित्य आणि मराठी चित्रपट - संबंध | प्रा. रमेश बा. रिंगणे | १८८ |
| ४९ | लोकसंख्या नियंत्रणात कुटूंब कल्याण कार्यक्रमाचा चिकित्सक अभ्यास | डॉ. भगवान डोंगरे | १९० |
| ५० | केंद्रिय अंदाजपत्रकातील महिलांसाठी तरतुदी | प्रा. महाजन संजय बाबूराव | १९४ |
| ५१ | Child Malnutrition: A Horrible Problem in India | Mr. Manal Bhagwan Suresh | २०४ |
| ५२ | भारत मे जनसंख्या नियंत्रण का प्रयास | प्रा. विद्या जगन्नाथराव भिल्लारे | २०९ |
| ५३ | व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसे' मधील शोषिकता | प्रा. डॉ. बाळासाहेब एस. चव्हाण | २११ |
| ५४ | शेतकऱ्यांच्या समस्या निर्मुलनात शासनाची भूमिका | डॉ. शंकर लेखने | २१५ |
| ५५ | Antibacterial activities of marine polychaetes Lumbrineris hetropoda | Vaidya V. V. | २१९ |
| ५६ | Parent - Child Relationships in the novles of Toni Morrison | Aniket Bhuyar | २२४ |

# शेतकऱ्यांच्या समस्या निर्मुलनात शासनाची भूमिका

**डॉ. शंकर लेखने**
सहाय्यक प्राध्यापक,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शंकरनगर, जि. नांदेड

**प्रस्तावना**

भारतातील ग्रामीण लोकांचा मुख्य व्यवसाय आजही शेती आहे. शेती या व्यवसायावर ग्रामीण अर्थव्यवस्था व लाखों कुटुबांचा उदरनिर्वाह अवलंबलून आहे. परंतु कमी व अनियमित पावसामुळे शेतीचा व्यवसाय संकटात आणि शेतकरी आत्महत्येच्या परिघात आला आहे. शेतकरी व शेतमजूर कुटुंबाची वाताहात दिवसेंदिवस वाढत चालली आहे. काळीज पिळवून टाकणाऱ्या घटना नित्याच्या झाल्या आहेत. दुष्काळाने जमीनीची सर्व क्षेत्रे काळवंडून टाकली आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशातील समस्यांपैकी भूक ही एक प्रमुख समस्या होती. भूकमुक्त भारताच्या दिशेने शासनाने व शेतकऱ्यांनी डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांक्ष्यासारख्या संशोधकाच्या सहाय्याने जे प्रयत्न केले त्यातून हरितक्रांती घडली. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. एकीकडे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत आहे. परंतु त्याचवेळी अन्नधान्यान्याचे उत्पादन करणारा शेतकरीवर्ग मात्र अत्यंत हलाखीचे व गरीबीचे जीवन जगत आहे. हा विरोधाभास समाजव्यवस्थेत प्रकर्षाने दिसून येतो. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची दाहकता एवढी वाढत गेली. की गेल्या दोन दशकामध्ये देशात दोन लाखांपेक्षा अधिक शेकतऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे आत्यहतेचे सत्र खंडित न होता. त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. हे विकासाचे नवनवे आयायाम निर्माण करणाऱ्या शासनव्यवस्थेसमोरील मोठे आव्हाण आहे. यावरुन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाने अन्नधान्याच्या उत्पादन वाढीरकडे लक्ष दिले. मात्र शेतऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्याकडे पुरेशे लक्ष दिले नसल्याचे शेतकऱ्यांच्या आत्महत्यावरुन दिसून योते.

महात्मा फुल्यांनी आपल्या 'इशारा' या ग्रंथमध्ये १८८५ साली नैसर्गिक अपत्तीमुळे व पाण्याच्या अभावामुळे शेतकऱ्यांचे जीवन कसे कठीण आहे. याविषयी केलेले वर्णन आजही लागू होणारे आहे. "शेतकऱ्यांस पाणी जर आहे, तर तेच त्यांचे सर्व धन व ऐश्वर्य आहे. त्यामध्येच त्यांच्या सर्व सोयी व आरामाच्या गोष्टी आहेत. कारण त्यास जर एकाच साली पाण्याने आपले हातचे सोडिले की, त्यांचे सर्व सौख्य जो. संपत्ती जात, ऐश्वर्य जाते आणि मुलाबाळासह व दुसारी कुंटुबातील माणसे त्यासह मोठे विपत्तीत पडतात. कित्येकांना आपला देश त्यांग करावा लागतो. कित्येक अन्नाकरिता त्राही त्राही होऊन लोकांच्या घरोघर, दारोदार लागतात. कित्येक आपले प्राणत्यागासही प्रवृत्त होतात."[१]

प्रस्तुत लेखामध्ये शेतकऱ्यांच्या समस्यांचा शोध घेऊन त्यांचे निमुर्लन करण्यासाठी शासनाने कोणकोणत्या उपायांची योजना गरणे गरजेचे आहे याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत लेख वर्णणात्मक स्वरुपाचा असून त्यासाठी माहिती संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे.

**शेतकऱ्यांच्या समस्या व शासनाचे धोरण :**

सद्यस्थितीत देशातील विशेषतः महाराष्ट्रातील शेतकरी 'असमानी व सुलतानी' अशा दोन्ही प्रकारच्या संकटात सापडलेला आहे. अनियमित पाऊस, अवर्षण, पूर यासारख्या समस्येबरोबरच शेतमालाला भाव नसणे, ग्राहक व व्यापाऱ्याकडून होणारी लूट व शासनाचा संवेदनशील दृष्टिकोन यातून वाट्याला येणरा कर्जबाजारीपणा, अवहेलना, व अपमान शेतकऱ्यांच्या नशीबी आला आहे.



Scanned with CamScanner

राष्ट्रीय नमुणा पाहणीत केलेल्या ५९ व्या सर्वेक्षणात महाराष्ट्रात ३६ लाख कर्जबाजारी शेतकरी आहेत. देशात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. उत्तरप्रदेशात ६९ लाख शेतकरी कुटुंब कर्जबाजारी आहेत. तर आंध्र प्रदेशात ४९ लाख शेतकरी कुटुंब कर्जबाजारी आहेत. याच पाहणीत असेही नमुद करण्यात आले आहे की, देशातील २७ टक्के शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज मिळाल, तर उर्वरित ७३ टक्के शेतकऱ्यांना खजगी सावकारावर अवलंबून राहवे लागते.[२] याचाच अर्थ शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडल्यामुळे त्यातुनच त्यांच्या असंख्य समस्या निर्माण होतात. विदर्भातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या कारणाचा शेध घेण्यासाठी 'अमरावती आयुक्तालयाने विदर्भातील ७७१ शेतकरी आत्महत्तेचा विचार करुन असा निष्कर्ष काढला की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या करण्यामागे प्रामुख्याने कर्जबाजारीपणा हे कारण होते. शिवाय व्यसनाधिनता (१३ टक्के), दिर्घ आजार (८ टक्के), मुलींच्या लग्नाचा भार (७ टक्के) ही कारणेही शेतकऱ्यांच्या आत्महत्यास काही अंशी जबाबदार असल्याचे दिसून येते.'[३] एकंदरीत शेतकऱ्यांच्या सर्व समस्या आर्थिक विवंचनेतून आणि कर्जबाजारीपणामुळे निर्माण होत असल्याचे अभ्यासातून समोर आले आहे.

विदर्भातील 'प्रकृती' या संस्थेने व हाऊसिंग अँण्ड लँड राईट्स नेटवर्क नवी दिल्ली यांनी संखुक्तपणे एप्रिल, मे, २०१६ मध्ये विदर्भातील वर्धा, यमवतमाळ अकोला व अमरावती या चार जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचा शेतजमीन आधिकार व निवारा हक्क या दोन्ही संदर्भात पाहणी अहवाल केला तेव्हा अतिशय विदारक स्थिती दिसुन आली. शेकऱ्यांच्सा आत्महत्या झाल्यानंतर कौंटुबिक कलह, मालकी हक्काचे वाद यातून कोटुंबिक व्यवस्था उध्वस्त होत असल्याचे दिसून आले आहे.[४]

आर्थिक संकटातूल फक्त एकटा शेतकरी आत्महत्या करीत नाही, तर संपूर्ण कुटुंब प्रत्येकक्षणी मरण यातना सहन करत जगत आहे. अशी स्थिती निर्माण झाली आहे.

**सद्यस्थिती व शासनाचे प्रयत्न :**

अनियंत्रित पाऊस, नापिकी, कर्जबाजारीपणा, यामध्ये अडकलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. परंतु हे प्रयत्न तोडके पडत चालले आहेत. 'महाराष्ट्र शासनाने सन २०१६-२०१७ हे वर्ष शेतकरी स्वाभिमान वर्ष म्हणून साजरे केले.' त्यासाठी २५ हजार कोटीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली होती. यातून जलयुक्त शिवार या कार्यक्रमासाठी एक हजार काटी रुपये, शेततळे, विहिरी व वीजपंप जोडणी या योजनेसाठी दोन हजार कोटी रुपयाची तरतद करण्यात आली आहे.[५] यासारख्या उल्लेखनिय कामाची सुरुवात शासनाने केली. तयातून काही प्रमाणात का होईना जल व्यवसथापनाची कामे झाली आहेत. 'सन २००८ साली शेतकऱ्यांना ८ हजार कोटी रुपयाची कर्जमाफी देवून शासनाने बळीराजाला दिलासा देण्याचा प्रयत्न केला.'[६] परंतु त्यानंतरही शेतकरी कर्जाच्या विळाख्यातून बाहेर आला नाही. पुन्हा नैसर्गीक अपत्तीमुळे व शासनाच्या अपुऱ्या उपाय योजनेमुळे कर्जबाजारी झाला आहे. सद्या महाराष्ट्रात विरोधी पक्षानी संपूर्ण कर्जमाफीचे आंदोलन सुरु केले आहे. त्यासाठी शासनावर ३० ते ३५ हजार कोटींचा बोजा पडेल असे शासनाकडून सांगण्यात येत आहे. त्याकरीता केंद्राकडून आवश्यक ती मदत मिळवून शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे.

शेतकऱ्यांना केवळ कर्जमुक्त करुन भागणार नाही. तर शेतकऱ्यांच्या सर्वांगीन विकास करण्यासाठी शासनाने व्यापक प्रमाणात प्रयत्न करणे गरजेचे आहे. कृषी विकासाचे नवीन प्रारुप तयार करुन ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे बनले आहे.



Scanned with CamScanner

**निष्कर्ष व शिफारशी :**

शासानाचे मुख्य ध्येय लोकांना चांगले जीवनमान उपलब्ध करुन देणे हे असते. लोकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करणे आणि त्यांना सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणं ही शासनाची जबाबदारी असते. 'सुशासन' या संकल्पनतं तर ही जबाबदारी अधिक वाढली आहे. त्यामुळे शासनाने उत्तरदायित्वाच्या भावनेने शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्या समुळ नाहीश्या करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

१. शेती हा व्यवसाय प्रामुख्याने पाण्यावर अवलंबून आहे. त्यासाठी शासनाने प्रभावी जलव्यवस्थापन योजना करावी. आपल्याकडे इस्त्रईलच्या शेतीची अनेक उदाहरणे सांगितली जातात. परंतु तेथील जलव्यवस्थानाचा प्रयोग मात्र आपल्याकडे प्रत्यक्षात आणला जात नाही. नदीतील पाण्याची वाफ होऊ नये म्हणून तेथे दुतर्फा झाडे लावली जातात. ठिबक सारख्या सिंचनपद्धतीचा प्रभावीपणे वापर केला जातो. तसे जलव्यवस्थापनाचे अभिनव प्रयोग करणे आवश्यक आहे. आपल्याकडे फक्त तळ्यातील पाण्याचे २५-३० टक्के बाष्फीभवन होते. यावरुन जलव्यवस्थापनाकडे जनतेचे व शासानाचे कमालीचे दुर्लक्ष दिसून येते.

२. राळेगणसिद्धी व हिवरेबाजर येथील विकास कामे डोळ्यासमोर ठेवून गावे स्वयंपूर्ण होण्यासाठी तेथील प्रयोगाचा व्यापक प्रसार व प्रचार करावे. 'तेथे फक्त पावसाचे पडणारे पाणी आडविले जाते. पूर्वी १५० एक्कर जमीनीला पाणी मिळत नव्हते आता १५०० एक्कर जमीनीला दोन्ही हंगामात पाणी मिळू लागले आहे. उत्पदन ६ ते ८ पटीने वाढले आहे. पूर्वी १२५ ते १५० लिटर दुध बाहेर जात नव्हते, आता ४००० लिटर दुध बाहेर जाते. दुध व्यवसायामुळे तरुणांना नोकरीपेक्षा जास्त पैसा मिळत आहे. पूर्वी गावात दरडोई उत्पन्न २०० ते २५० रुपये इतके होते आता ते २००० रुपयावर गेले आहे.'[७] म्हणून लोकसहभाग हा विकासाचा आधार आहे, तो वाढवून शासनाने ग्रामीण विकास व कृषी विकासाची कामे करावी.

३. कृषी उत्पादनास योग्य भाव देण्यासाठी शासनाने मनापासून प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन शेती उत्पादनावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाची व कारखान्याची ग्रामीण भागात उभारणी करावी. शेतकऱ्यांच्या मालाचा भाव शेतकऱ्यांना निश्चित करता आला पाहिजे.

४. शेतीसाठी उपयुक्त बी-बियाणे, औषध, यंत्रसामग्री, आवजारे यासाठी शासनाने मदत करावी. बोगस बियाणे, व औषधावर प्रतिबंध करण्यासाठी कठोर उपाययोजना करव्यात, तसेच यांच्या किमंती नियंत्रणात आणून त्या गुणवत्तापूर्ण असाव्यात यासाठी शासनाने आणखी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

५. नैसर्गिक अपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास त्वरीत पंचनामा करुन संबंधीत शेतकऱ्याला मदत मिळण्यासाठी प्रभावी अपत्ती व्यवस्थापन यंत्रणा असली पाहिजे. शेतकऱ्यांचे मनोबल खचू नये यासाठी या यंत्रणेने व्यापक दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.

६. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी कर्जमाफी आवश्यक आहे, परंतु त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांना सक्षम करणे त्यांच्या श्रमाला व उत्पादनाला योग्य किमंत मिळाली पाहिजे.

७. गजानन खातू यांनी त्यांच्या 'स्वप्नांच्या शोधात महाराष्ट्र' या पुस्तकामध्ये वंदना शिवा यांनी मांडलेली "सर्क्युलेशन ऑफ मनी" ही संकल्पना अधोरेख्रित केलेली असून ती प्रत्यक्षात आणली पाहिजे. ते म्हणतात, ग्रामीण जनतेला ऐंशी टक्के उपन्न हस्तांतरण शहराकडे होत आहे. त्यामुळे ग्रामीण व्यवस्थेत सर्क्युलेशन ऑफ मनीमुळे अर्थव्यवस्था गतिमान होते. त्यात समाजाचे उत्पन्न वाढते. साधारणपणे या नियमानुसार सातवेळा पैशाचा पुनर्वापर होऊन समाजाचे उत्पन्न सातपट होते. पण ग्रामीण भागातला पैसा ग्रामीण भागातच राहिला आणि स्थानिक पातळीवर उत्पादनातून गरजा भागल्या तरच हे होऊ

शकते. प्रत्यक्षात ग्रामीण भागात दोनवेळाही पैशाचा पुनर्वापर होत नाही. कारण शहरी उत्पादनानी तो आगोदरच खेचून नेलेला असतो. म्हणून तर शहरे श्रिमंत आणि गावे गरीब होतांना दिसतात.[६] खेडी स्वयंपूर्ण व स्वावलंबी व्हावी, शेतमालावर आधारित छोटे-छोटे उद्योग ग्रामीण भागात निर्माण करुन कृषी उद्योगाची सांगड कशी घालावी. यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

८. १९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणांचा सर्वव्यापी परिणाम झाला आहे. मुक्त व्यापार धोरणामुळेही देशातील कृषी उत्पादनावर तसेच शेतमालाच्या भावावर परिणाम होत आहे. त्यामुळे शासनाने आपले आयात-निर्यात धोरण निश्चित करतांना आपल्या देशातील शेती व शेतकरी यांच्यावर अनिष्ट परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी. केवळ देशाचा आर्थिक फायदा विचारात घेवू नये.

९. अल्पभूधारक व गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना शासनाने उच्च व व्यावसायिक शिक्षणाची पूर्ण फिस माफ करावी. ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेती व शेतीपुरक व्यवसाय करणाऱ्या लोकांसाठी शारिरिक व मानसिक आरोग्य वाढीसाठी नियमित आरोग्यविषयक कार्यक्रम राबवावेत. तसेच अशा आरोग्य केंद्रात प्रशिक्षित समुपदेशकांची नियुक्ती करावी.

१०. वन्यप्राण्याकडून होणारे शेतीचे नुकासान टाळण्यासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना करणे गरजेजे आहे. ग्रामीण भागात यासाठी शासन कोणतही उपाय करीत नसल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे.

११. सिंचन सुविधा मुबलक करावी. यासाठी शेतीचे तुकडीकरण झालेल्या गावामध्ये शेततळ्याबराबरच सार्वजनिक साठवण तलावाची व्यवस्था करुन तेथील शेतकऱ्यांना सुक्ष्म जलसिंचन (ठिबक, तुषार इ.) याचा वापर करता यावा यासाठी शासनाने यासाधनासाठी अनुदान द्यावे. तसेच सौर उर्जेवर चालणारी पंप व इतर कृषी साधने अनुदावनार उपलब्ध करुन द्यावीत.

**सारांश :**

खरा भारत खेड्यामध्ये वसला आहे. त्यामुळे भारताची सर्वांगिण प्रगती करायची असेल तर खेड्यात राहणाऱ्या लोकांचा मुख्य व्यवसाय असलेल्या कृषीचा विकास घडवून आणणे गरजेचे आहे. शेतकरी संकटातून, आर्थिक विवंचनेतून मुक्त झाल्याशिवाय ते शक्य नाही. त्यामुळे शासनाने पुन्हा एकदा कृषीला प्राधान्य देऊन शेतकऱ्यांच्या समस्यांचे निमुर्लन करणे काळाची गरज बनली आहे. आज पुन्हा स्. लालबहादूर शास्त्रींनी दिलेल्या जय जवान जय किसान या विकास मंत्राचे स्मरण करण्याची आणि तो मंत्र आचरणात आण्ण्याची गरज निर्माण झाली आहे.

**संदर्भ :**

१. महात्मा फुलेंच्या दुर्मिळ पुस्तिका संग्रह, इशारा, नाग-नालंद प्रकाशन, इस्लापूर, २०११, पृ.६०
२. डॉ. अशोक ढवळे, स्वातंत्र्योत्तर भारतातील बदलते कृषी धोरण आणि विकास : भाषा विकास आणि राजकारण, (संपादक-डॉ.मरोती तेगमपुरे व इतर), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाध्द,२०११ पृ. ८६
३. उपरोक्त, पृ. ८८
४. सुवर्णा दामले आपुलीच माणसे होती आपुलीच वैरी लोकसत्ता चतुरंग दि.२ जूलै २०१६ पृ. १
५. दैनिक लोकसत्ता, दि. १९ मार्च २०१६ पृ. १
६. दैनिक लोकसत्ता दि. १०-०३-१७ पृ.०८
७. अण्णा हजारे, माझे गाव माझे तीर्थ, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, २००२, पृ.९५



Scanned with CamScanner